## Out of Turn परीक्षा घेण्याबाबत महत्त्वाच्या सूचना:--

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील जे विद्यार्थी मंडळाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार भाषा विषयाच्या तोंडी परीक्षेस उपस्थित राहू शकले नसतील अशा विद्यार्थ्यांची Out of Turn परीक्षा घेण्याची तरतूद असल्याने सदर विद्यार्थ्यांचे परीक्षेस प्रविष्ठ न होण्याचे कारण नमूद केलेला अर्ज, वैद्यकीय प्रमाणपत्र/तत्सम कारण, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे अभिप्राय, प्रवेशपत्राची छायांकित प्रत, प्रती विषय रू. १००/- प्रमाणे निर्धारीत परीक्षा शुल्कासह मंडळ कार्यालयात दि. १९/०३/२०१८ पर्यंत सादर करावी. (दि.१९/०३/२०१८ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.)

सदर शुल्क भरलेल्याच विद्यार्थ्यांची Out of Turn परीक्षा दिनांक २१/०३/२०१८ व दि.२२/०३/२०१८ रोजी घेण्यात यावी. संबंधित विद्यार्थ्यांचे गुण Out of Turn चे निर्धारीत शुल्क भरलेल्या पावतीसह सोमवार दि.२६/०३/ २०१८ रोजी मंडळास समक्ष सादर करावे.

## फेब्रु./मार्च २०१८ च्या परीक्षेसाठी खास सूचना

फेब्रु./मार्च २०१८ च्या परीक्षेपासून क्रीडा प्रस्ताव विविध प्रपत्रासह मंडळात सादर करावयाची अंतिम तारीख ३० एप्रिल २०१८ राहील.. सुधारीत क्रीडा सवलतीबाबत सुधारीत परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

प्रति,

प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कक्षेतील सर्व मान्य प्राप्त कनिष्ट महाविद्यालये.